रविवार, दि. ५ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ४७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना जिल्हा अतिवृष्टीच्या यादीतून वगळला; प्रशासनातील चुकीमुळे शेतकऱ्यांवर संकट

### आमदार बबनराव लोणीकर यांचा गंभीर आरोप

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांवर शासन मदतीचा दिलासा मिळणार, अशी अपेक्षा असतानाच जिल्ह्याला अतिवृष्टीच्या यादीतून वगळण्यात आल्याने शेतकरी वर्गात संताप व संभ्रमाची लाट पसरली आहे. ही स्थिती कोणत्याही नैसर्गिक कारणामुळे नव्हे, तर प्रशासनातील गंभीर चुकीमुळे उद्भवल्याचा आरोप आमदार बबनराव लोणीकर यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात केला.

**पंचनाम्याचा अहवाल थांबला**

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेती पिकांचे, घरांचे व पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर महसूल व कृषी विभागाने तातडीने पंचनामे करून अहवाल निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालयात सादर केला. शासनाच्या नियमानुसार हा अहवाल ७२ तासांच्या आत शासनाकडे पाठवणे बंधनकारक असताना, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी तो अहवाल तब्बल ७ दिवस कार्यालयातच ठेवला.

या विलंबामुळे शासनाकडे जालना जिल्ह्याचा अहवाल पोहोचला नाही आणि त्यामुळे जिल्हा अतिवृष्टीग्रस्तांच्या यादीतून वगळला गेला.

**आमदार लोणीकर यांचा रोष**

आमदार बबनराव लोणीकर यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना म्हटले, शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. त्यांच्याकडे सरकारच्या मदतीशिवाय दुसरा पर्याय नाही. परंतु निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या निष्काळजीपणामुळे संपूर्ण जिल्हा यादीबाहेर गेला. ही शेतकऱ्यांवर दुहेरी अन्यायाची वेळ आहे.

त्यांच्या तक्रारीनंतर शासनाने तात्काळ पावले उचलली असून निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांच्याकडून चार्ज काढून घेण्यात आला आहे.

**सरकारची भूमिका**

मदतीबाबत संभ्रम निर्माण झाला असला तरी शासन खंबीर आहे, सरसकट निर्णय घेतला जाणार आहे, असे आश्वासन माजी मंत्री तथा आमदार अर्जुन खोतकर यांनी दिले.

त्यांनी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांवर आलेल्या संकटाची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. सरकार मदतीच्या पाठीशी उभे राहणार आहे. फक्त प्रक्रियेत झालेल्या त्रुटीमुळे तात्पुरता अडथळा आला आहे.

**प्रशासकीय जबाबदारीचा अभाव**

नियमानुसार ७२ तासांचा कालावधी हा केवळ औपचारिकता नसून मदतीचा



निर्णय लवकर घेण्यासाठी महत्त्वाचा टप्पा आहे. तो पाळला गेला नाही.

अधिकाऱ्यांची जबाबदारी व शिस्त या प्रकरणात मोठ्या प्रमाणात उघड झाली आहे. एका अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे संपूर्ण जिल्हा संकटात सापडला.

अशा चुका केवळ कारवाईपुरत्या मर्यादित न ठेवता, यंत्रणेत कार्यपद्धतीचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे.

यामुळे शेतकऱ्यांचा शासनावर असलेला विश्वास डळमळीत होतो. आपत्तीच्या काळात प्रशासनाने अधिक जबाबदारीने वागण्याची गरज असते.

**शेतकऱ्यांची परिस्थिती**

सततच्या पावसामुळे कापूस, सोयाबीन, उडीद, मूग यासह खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांची घरे व जनावरेही बाधित झाली आहेत. विमा योजनांमध्ये मिळणारा लाभ अपुरा ठरत असल्याने शेतकऱ्यांची अपेक्षा थेट शासनाच्या मदतीवर आहे. शासनाकडून पान २ वर

जालना महापालिकेचा धक्कादायक प्रकार

## नदीपात्रात मनपाच्या कर्मचाऱ्यांकडूनच कचरा

**जालना । प्रतिनिधी -** एकीकडे जिल्हा प्रशासन स्वच्छ नदी-स्वच्छ जालना मोहिम राबवत असताना, दुसरीकडे जालना महापालिकेचेच कर्मचारी नदीपात्रात कचरा टाकताना पकडले गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. कुंडलिका नदीत ट्रॅक्टरमधून थेट कचरा टाकल्याचा व्हिडिओ सार्वजनिक झाल्यानंतर महापालिका प्रशासनावर टीकेची झोड उठली आहे.

सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी हा व्हिडिओ जनतेसमोर आणत सरळ सवाल केला, स्वच्छतेची जबाबदारी घेणारेच जर नदीत कचरा टाकणार असतील, तर नागरिकांनी कोणाकडे पाहावे? स्वच्छता निरीक्षक प्रमुख साहेब, तुमच्या डोळ्यात माती गेली काय? या धक्कादायक प्रश्नाने प्रशासन हादरले असून, नागरिकांमध्ये स्वच्छ भारत अभियान फक्त कागदोपत्री



आहे का? असा संशय व्यक्त केला जात आहे.

कुंडलिका नदीत स्वच्छता मोहिमेच्या नावाखाली गोळा केलेला कचरा टाकला जात असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. यात स्पष्टपणे पालिकेच्या ट्रॅक्टरमधून थेट नदीपात्रात कचरा फेकला जात असल्याचे दिसते. हा प्रकार समोर आल्यानंतर नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी महापालिकेची जोरदार खिल्ली उडवली.

या घटनेची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांनी दोषींवर कठोर कारवाई होणार असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी माध्यमांना सांगितले नदी प्रदूषण हा गंभीर गुन्हा आहे. दोषींना सोडले जाणार नाही. संबंधित ठेकेदार, स्वच्छता निरीक्षक व कर्मचारी यांच्यावर निलंबनासह कठोर कारवाई केली जाईल.

जालना शहरातील अनेक भागात कचऱ्याचा प्रश्न आधीच तीव्र आहे. नद्यांचे पान २ वर

युवा आदर्श

### इव्हेंट ...

नेहमी चाले उत्सव
करे सर्वत्र वरचेवर
इव्हेंट मॅनेजमेंट ते
गाजे शहर गावभर
मोठ मोठाले मंडप
रे पहुंडले रस्त्यावर
रस्ते झाले खड्डेमय
केले खड्डे खोलवर
वीज कनेक्शन घ्या
कुठल्याही पोल वर
कुणा आहे दहशत
असले पोलखोलवर
डीजेला घाला शपथ
आवाज वाढे ढोलवर
डेसिबल चिंता नाही
ओळखी असे दूरवर
ठेका धरतात पुढारी
अति उत्साह अनावर
नशेत कुणी झिंगतात
अंकुश कुठले मनावर
उधळण हार फुलांची
रे गुलाल जेसीबी भर
मने सगळी कुजलेली
सुटली दुर्गंधी गावभर
सामान्यांचे निधी खर्च
प्रस्थ वाढतेयं भराभर
समस्या मात्र तशाचं
उभ्या प्रतिक्षे भारंभर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## ‘आदित्य विक्रम बिर्ला मेमोरियल व्यापार उन्नयन केंद्र’ तर्फे लक्ष्मीनारायण मानधना यांचा सन्मान



**चेन्नई -** अखिल भारतवर्षीय माहेश्वरी महासभाच्या वतीने आयोजित ‘श्री आदित्य विक्रम बिर्ला मेमोरियल व्यापार उन्नयन केंद्र’ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (Annual General Meeting) लक्ष्मीनारायण मानधना यांना पद्मभूषण राजश्री बिर्ला यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. शनिवार, ५ ऑक्टोबर २०२५ रोजी चेन्नई (तामिळनाडू) येथे हा सोहळा संपन्न झाला. मानधना यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल हा विशेष पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या महत्त्वपूर्ण सोहळ्यासाठी व्यासपीठावर अनेक मान्यवर उपस्थित पान २ वर

## संत निरंकारी मिशनला मानवसेवेतील अद्वितीय योगदानासाठी विशेष सन्मान

**जालना । प्रतिनिधी -** गांधी जयंतीच्या निमित्ताने २ ऑक्टोबर, २०२५ रोजी श्रीनगर येथील इंटरनॅशनल हॉटेल मध्ये गांधी ग्लोबल फॅमिलीच्या वतीने एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाची अध्यक्षता पद्मश्री डॉ. एस. पी. वर्मा यांनी केली. या कार्यक्रमाचा उद्देश महात्मा गांधींना श्रद्धांजली अर्पण करणे तसेच त्यांच्या सिद्धांत व विचारांना पुनः स्मरण करणे हा होता. या गौरवशाली कार्यक्रमात अनेक प्रतिष्ठित संस्थांनी देखील सहभाग घेतला, ज्यामध्ये संत निरंकारी मिशनचे प्रतिनिधित्व करत संत निरंकारी मंडळाचे सचिव श्री. जोगिंदर सुखीजाजी यांची उपस्थिती सन्माननीय होती. श्री. सुखीजाजी यांनी महात्मा गांधींना श्रद्धांजली अर्पण करत आपल्या संबोधनात संत निरंकारी मिशनचा मूलभूत



सिद्धांत मानवाला मानव प्रिय असावा, एकमेकांचा आधार बनावा अधोरेखित केला. निरंकारी मिशन कशा प्रकारे विश्वबंधुत्व, एकत्व आणि बंधुभावाच्या भावनेचा प्रभावी प्रसार करीत आहे हे त्यांनी सांगितले. या प्रसंगी त्यांनी सर्व मान्यवर व्यक्तींना व संस्थांना आगामी निरंकारी संत समागम जो ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे होणार आहे त्यासाठी आमंत्रित केले. ते पुढे म्हणाले, की संत समागम हा असा आध्यात्मिक मंच आहे, जिथे सर्व धर्म, जात पान २ वर

आदरणीय सुरेशसेठ काबरा यांना वाढदिवसाच्या
प्रेरणास्थान

हार्दिक शुभेच्छा
मा. श्री सुरेशसेठ काबरा
माजी अध्यक्ष
नवभारत शिक्षण संस्था
टेंभूर्णी, ता. जाफ्राबाद, जि. जालना.
* शुभेच्छुक *
सर्व पदाधिकारी, सर्व संचालक मंडळ, सर्व विश्वस्त, प्राचार्य, उपप्राचार्य,
सर्व प्राध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षिका, सर्व कर्मचारी बंधु-भगिनी.
सौजन्य : संचालक विश्वनाथ सांगोळे,
संचालक, उपप्राचार्य दत्ता देशमुख.

## संपादकीय

## तंत्रज्ञानाचा बादशहा

आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ऍपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ऍपल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन. स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल - क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला. सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलमजुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती. हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता. दोंघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले. कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ऍपल. पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली. त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ऍपल १ पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्ह ने अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ऍपल कंपनी सोडली. १९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते. या कंपनीने ऍनिमेशन सिनेमे बनवले. ते खूप गाजले. या कंपनीने वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ऍपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ऍपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ऍपलमध्ये परतले. आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ऍपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ऍपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला. हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत. हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ऍपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला. टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ऍपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले. सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते. ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते. नवनिर्मितीचा ध्यास, तंत्रज्ञानाची आवड, मार्केटिंगमधील कौशल्य, सतत शिखरावर राहण्याची जिद्द या गुणांमुळे स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला. त्याचा प्रतिस्पर्धी मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# डी.जे.च्या तालावर थिरकतांना ; समाजभान-कर्तव्याची जाण ठेवा

गेल्या चार-पाच दिवसापासून पुण्याच्या खासदार व भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष डॉक्टर मेधा कुलकर्णी यांचा, गरबा आणि दांडियाच्या वेळेस कर्कश्श आवाजात वाजवला जाणारा डीजे बंद केला त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होत आहे. त्यावर उलट सुलट चर्चा होत आहे.

काही वर्षापासून मिरवणुकीमध्ये डी.जे नाही असे होत नाही. मिरवणुकीमध्ये डी.जे एक आवश्यक बाब झाली आहे . डी.जे नसेल तर मजाच नाही, असे समीकरण झाले आहे. मग ती मिरवणूक गणपती स्थापनेची असो, विसर्जनाची असो. दुर्गा उत्सवातील असो, गरबा दांडिया किंवा लग्नाच्या वरातीची असो, महापुरुषाच्या जन्मतिथी निमित्त असो त्यात डी.जे हवाच हा आग्रह असतो. दहीहंडी,होळी, धुळवडचा कार्यक्रमातही डी.जे लावला जातो.

परवा नवरात्रात एका ठिकाणी साधारण वयाची लहान मुल-मुली,स्त्रिया नाचत होत्या. गाणी कोणते

हाय रे हाय निंद नही आय.....भिगी.भिगी.. रातोमे..व्वा अहो ! नवरात्री उत्सव आहे.देवी च्या गाण्यावर ताल धरा नं.पण नाही... डि. जे.ला अशी गाणी नको.बहुतांश ठिकाणी हेच अनुकरण.

डी.जे म्हणजे काय तर त्याला डिस्क जॉंकी असे म्हटले जाते. त्यात रिमिक्स गाणे,संगीत वगैरे असतात आणि ती मोठ्या आवाजात लावून मग त्याच्या तालावर नाचतात.. बेभान होवून. तो आवाज जितका जास्त मोठा... कर्कश तितका नाचणाऱ्यांचा उत्साह वाढत असतो. असे काही असते. मग त्या आवाजाचा कोणाला काय त्रास होतो त्याचे भान नसते. भान राहत नाही.

उत्सव साजरे करताना उत्साह जरूर हवा आणि त्या उत्सवाचा आनंदही घ्यावा. परंतु दिवसेंदिवस असे उत्सवातून आनंद मिळवतांना त्याच्या अतिरेकाने किंवा अति उत्साहाने त्रास व्हायला लागला आहे असे म्हणावे लागेल. उत्सवात युवा वर्गाने सहभागी होताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

डी.जे चा वापर करताना एका ठराविक मर्यादेपर्यंत आवाज ठेवल्यास काही हरकत नाही. ऐकावेसे वाटेल पण अति कर्कश्य मोठ्या आवाजात जर ते रिमिक्स लावले गेले तर आजूबाजूच्या अनेक घटकांना त्रासच संभवतो आणि आपल्या आनंदासाठी खूप लोकांना त्रास होणे हे सुद्धा काही योग्य नाही. आपले घरात लहान मुले, वयस्कर, आजारी माणसे आहेत याचा विचार करायला हवा. मध्यंतरी काही घटना घडल्यामुळे परत हा विषय सोशल मीडियावर चर्चेला आला आणि त्यावर खूप मोठ्या प्रमाणात मत मतांतरे येऊ लागलीआहेत.

पुण्याच्या खासदार डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी अशाच प्रकारे त्यांच्याकडे काही तक्रारी आल्यामुळे त्यांनी पोलीसांना त्यासंबंधी सांगूनही उपयोग न झाल्यामुळे प्रत्यक्ष तिथे जाऊनच डीजे बंद केला.अर्थातच करायला भाग पाडले. अशाच प्रकारे मागे रामनवमीच्या वेळेस त्यांनी केले होते त्यांच्या या कृतीमुळे त्यांच्यावर त्यांच्या बाजूने त्यांच्या विरोधात बरीच चर्चा झाली परंतु त्यांनी केलेली कृती हे काही गैर म्हणता येणार नाही.

स्थानिक नागरिकांनी केलेल्या तक्रारीनंतर मी हा पवित्र घेतला असून नियमाचा भंग करत त्या ठिकाणी ऊा वाजवले जात असल्याचा आरोप मेधा कुलकर्णी यांनी केला आहे. मी यासंदर्भात पोलीस अधिकाऱ्यांशी देखील चर्चा केली होती. मात्र, पोलिसांनी त्या ठिकाणी काहीही कारवाई केली नाही म्हणून मला जावे लागले. त्या ठिकाणी अनेक ज्येष्ठ नागरिक राहतात त्यांची तक्रार वारंवार येत होती म्हणून मी आक्रमक पवित्रा घेतला असल्याचे स्पष्टीकरण मेधा कुलकर्णी यांनी दिलं आहे. तर या पुढे डी.जे.च्या विरोधात आणि जी आवाजाची मर्यादा वारंवार ओलांडली जात आहे. कर्णकर्कश डी.जे विरोधात पुण्यात जनआंदोलन उभं करु, असा इशाराही मेधा कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना दिला.

परंतु त्यांच्या या कृतीच्या समर्थनार्थ पुण्यातील आमदार खासदारांनी काही पाठिंबा दर्शक विधाने केल्याचे वाचण्यात आलेले नाहीत. अर्थातच कार्यकर्त्यांच्या रोशाला सामोरे जावे लागेल म्हणूनच कोणी या भानगडीत पडत नाही. वाईटाला वाईट, आणि चांगल्याला चांगले म्हणण्यात काय वाईट आहे ? अशी भूमिका घेऊन जर सुसंवाद साधला गेला तर डी. जे.ही सुरू राहील आणि कार्यक्रमातला उत्साह राहील.फण अशी हिंमत कोणी दाखवत नाही. बंदी घाला म्हणून. बंदी तर घातलेली आहे. पण तरीही नियम कायदे तोडून हे सुरू आहे. त्यापेक्षा जर त्याचे पालन झाले आणि त्याची जबाबदारी ज्यांचेवर दिली आहे त्यांनी पार पडली आणि त्याचबरोबर महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या अधिकाऱ्यांवरही राजकीय दबाव नसला तर अशा गोष्टी घडणारच नाहीत.

डी.जे.च्या आवाजाचा त्रास होऊन चक्कर आल्याच्या घटना, डीजे आवाजान कायमस्वरूपी बहिरेपण आल्याची घटना तर कुठे बीपीच्या त्रास असणाऱ्यांना अटॅक आल्याची घटना तर लग्नकार्यात डी.जे च्या आवाजाने नवरदेव चक्कर येऊन पडला आणि मृत्यू झाला अशी घटना गेल्या काही काळात घडलेले आपण सगळ्यांनीच वाचले आहे.

डी.जे.च्या कर्कश आवाजामुळे आजूबाजूच्या हॉस्पिटल्स, शाळा, घरांना, घरातील वृद्धांना, आजारी माणसांना त्रास होत असतो. परंतु त्याचा विचार होत नाही आणि उत्साहाच्या भरात कोणी या गोष्टीकडे लक्ष देत नाही. रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांना याचा त्रास होत असतो




तुम्ही बडवा ढोल,बडवा डी.जे आम्ही पाहून घेऊ असे म्हटल्यानंतर पोलिसांचीही हिंमत होत नाही आवाज कमी करायला सांगण्याची. अर्थातच तक्रारही केली तर मग पाहून घेवू त्याला अशी भाषा. मग कशाला सर्वसामान्य माणूस तक्रार करणार.सहनच करणार.

डी.जे चा वापर करताना जर आवाजाची पातळीची डेसिबल ची मर्यादा ओलांडली नाही तर सर्वसामान्यांना कुठलाही त्रास होणार नाही आणि कार्यक्रमात उत्साही लोकांचा उत्साही कमी होणार नाही याचे जर भान सगळ्यांनीच ठेवले तर असे प्रसंग उद्भवणार नाही उलट समाजातील सर्वच घटकांनी एकत्र येऊन याविषयी चर्चा करणे, एकमेकात सुसंवाद घडवून आणणे आवश्यक आहे. उत्सवामध्ये वाद्य हे हवेच पण त्याचा वापर योग्य रीतीने झाला तर मग प्रश्नच येत नाही. पुण्याप्रमाणेच अनेक ठिकाणी अनेक जिल्ह्यात, तालुक्यात या घटना घडत असतात. त्याच्याविषयी मग ओरडा सुरू होतो. डी.जे वर अनेक वेळा अशा मिरवणूक घेऊन जाताना मुलांना वयस्कर माणसांना त्रास होऊन चक्कर येऊन पडल्याच्या बातम्या वाचल्या आहेत काही वेळात आवाजाने मृत्यू झाल्याची बातमी वाचले आहे. आता तर लग्नाच्या मिरवणुका सुद्धा दोन-दोन, तीन- तीन तास सुरू असतात.अशा मिरवणुका रस्त्याने किंवा गल्लीतून जात असताना अक्षरशः घराच्या चौकटी थरारतात, भांड्याच्या रॅक मध्ये भांड्याचा आवाज येतो, म्हणजे त्याची कंपन एवढी जाणवतात तर पादचार्यांना किती जाणवत असेल याची कल्पना करावी.

अशा अनेक घटना घडत असतात. सगळ्यांनाच प्रसिद्धी मिळत नाही. तेव्हा एखादे प्रकरण माध्यमाद्वारे उचलले जाते. त्याला प्रसिद्धी मिळते त्याच वेळेला अशा गोष्टी समोर येतात आणि मग त्याच्यावर तात्पुरते का होईना विचारमंथन सुरू होते.

यासाठी मिरवणुकीला किंवा वरातीला दिलेली वेळ, निरनिराळ्या कार्यक्रमासाठी दिलेल वाद्य परवानगी आणि त्या वाद्याची क्षमता म्हणजेच (डेसिबल) आवाजाची पातळीवर नियंत्रण असावे. ७० डेसिबल पेक्षा जास्त आवाज कोणासाठीही धोकेदायक ठरू शकतो. ध्वनी प्रदूषण कायद्यानुसार निवासी भागासाठी

दिवसा ५५ डेसिबल आणि रात्री ४० डिसिबल मर्यादा असावी असे आहे. परंतु त्याचे नेहमीच उल्लंघन केले जाते. आणि असे उल्लंघन झाल्यास दीर्घकाळ तो आवाज असल्यास बहिरेपणा येण्याची शक्यता असते तसेच ब्लडप्रेशर, हृदय विकार, या रुग्णांना धोका असतो. आपल्याकडे फक्त वाद्याला परवानगी दिली म्हणजे झाले, मग ती मिरवणूक, वरात, किती वेळ चालते आवाजाची मर्यादा काय आहे ? हे कोणी बघतच नाही. अर्थात त्यालाही अनेक कारणे आहेत त्याची चर्चा सध्या सोशल मीडियावर सुरू आहे. राजकारण्यांचा हस्तक्षेप, अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता, तसेच डी.जे मालकांचा दबाव, या गोष्टी कारणीभूत आहे. राजकारण्यांचे त्यांचे जवळचे संबंध असतात, तसेच पोलीसांनवरिल दबावामुळे ते दुर्लक्ष करतात. शाळा, हॉस्पिटल ,न्यायालय , सायलेन्स झोन असतात त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्रास अनेक लोकांना होतो पण तक्रार करायला कोणी धजत नाही. आणि तक्रार नाही त्यामुळे कोणी काहीच कारवाई करत नाही असे होते. अनेक वेळा पोलिसांसमोरही डी.जे. कर्कश आवाजात वाजवला जातो परंतु ते स्वतः होऊन काहीही करत नाही. साहेब तुम्ही रिकामे काम करू नका असे त्यांना सांगितले जाते.

प्रदूषण महामंडळ आहे पण अशा कार्यक्रमाच्या संदर्भात ते ध्वनिप्रदूषणासाठी काही ठोस भूमिका घेत नाही.अशी चर्चा सुरू आहे. तीही योग्यच आहे.

माझ्या परिचित एक ग्रहस्थ होते त्यांनी त्यांचा अनुभव सांगितला. त्यांच्या घरापासून जवळच एक दोन तीन मिनिटाच्या अंतरावर जवळपास दीड ते दोन तासापासून डी.जे.वर कर्कश आवाजात गाणे सुरू होते. त्यांना त्रास व्हायला लागला म्हणून त्यांनी पोलीस स्टेशनला फोन लावून दोन-तीनदा विनंती केली परंतु तासाभरानंतरही आवाज कमी झाला नाही. बघतो मी, सांगतो मी, याच्यातच वेळ निघून गेला. शेवटी चिडून त्यांच्याशी बोलल्यानंतर त्यांनी स्पष्ट सांगितले, अहो ! आम्हाला नोकरी करायची आहे दादा. आम्हाला शिवीगाळ होते. काय करणार ? आता मी स्वतः जातो. त्यानंतर ते स्वतः गेले आणि विनंती करून आवाज कमी करायला लावला. थोडक्यात काय नियम आहे, कायदा आहे, परंतु त्याची अंमलबजावणी अभाव. अशा परवानगी देतानांच वेळेची मर्यादा आणि आवाजाची मर्यादा दोन्ही गोष्टीवर नियंत्रण हे ठेवायलाच पाहिजे. आणि त्यासाठी आवाजाची मर्यादा मोजण्यासाठी योग्य ते साधन पुरवायला पाहिजे. आणि ते जर पाळले नाही तर कारवाई ही व्हायलाच पाहिजे.

समाजात जशी चांगली व वाईट माणसं असतात, म्हणजेच सज्जनशक्ती व दुर्जनशक्ती कार्यान्वित असतात. थोडक्यात दुर्जनशक्ती कमी करायची असल्यास सज्जन शक्तीत वाढ करणे आवश्यक आहे.हे कोण करणार. ?तुम्ही आम्हीच योग्य विचार करायला हवा.चांगला विचार करायला हवा.तो करणाऱ्याला साथ द्यायला हवी.

तूर्त एवढेच.

**दिलीप देशपांडे, जामनेर. जि.जळगांव**
**मोबा. ८९९९५६६९१७**
dillipdeshpande24gmail.com

## निकिता बैनाडे विभागीय स्पर्धेसाठी पात्र

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - गुरुकुल उच्च माध्यमिक विद्यालय, क्षीरसागर ची विद्यार्थिनी निकिता रामकिसन बैनाडे हिने जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत दणदणीत विजय मिळवत विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी पात्र झाली आहे. त्याबद्दल तिचे हार्दिक अभिनंदन त्याबद्दल खेळाडूचे संस्थेचे सचिव मा.सभापतीश्री लक्ष्मणराव पाटील दळवी अध्यक्ष श्री योगेश पाटील दळवी संस्थेचे पदाधिकारी सौ.कासाबाई दळवी,दिनेश दळवी,सौ. गिता ताई गावंडे व प्राचार्य श्री पंढरीनाथ शिंदे सर व क्रीडा शिक्षक श्री भरत सिरसाट, श्री मंगेश रगडे सर प्रशासकिय अधिकारी आनंद वाघ यांनी पहिलवानांचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा.






# विजया दशमी निमित्त जालना जिल्ह्यात शस्त्रपूजन सोहळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर जालना जिल्हा सिलंबम असोसिएशन, जालना जिल्हा मर्दानी खेळ असोसिएशन व मराठवाडा एल्बो बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा सन्मानपूर्वक पूजन सोहळा पार पडला.

कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिषेक व पूजन करून मराठ्यांच्या शौर्याची परंपरा दर्शविणारी पारंपरिक शस्त्रे जसे की दंडपट्टा, खंडा, मराठा कटार, मराठा धोप या शस्त्रांचे विधिवत पूजन करण्यात आले.

यावेळी संघटनेचे सचिव प्रा. डॉ. नितिन भक्त यांच्या हस्ते महाराजांची आरती करण्यात आली.

नवदुर्गा मर्दानी खेळ आखाडा यातील विद्यार्थी - मानस दबबडवार, पृथ्वीराज बेंद्रे, आरवी रामदासी, रुद्राक्ष यादव यांनी शस्त्रपूजन सोहळ्यात सक्रिय सहभाग घेतला.

सहायक प्रशिक्षक प्रतीक्षा दबबडवार, गिरिजा टाकळकर तसेच मराठवाडा सिलंबम टेक्निकल डायरेक्टर भूषण यादव उपस्थित होते.

या शस्त्रपूजन सोहळ्यातील शिस्तबद्ध वातावरण व पारंपरिक खेळांबाबतची तरुणाईची आवड यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण होते. संघटनांनी अशा उपक्रमांद्वारे छत्रपतींच्या पराक्रमाची आठवण कायम ठेवत तरुण पिढीला प्रेरणा देण्याचा संकल्प व्यक्त केला.

विजयादशमी ही केवळ धार्मिक पर्व नसून शौर्य, पराक्रम व सदाचाराचा वारसा जपण्याचा दिवस आहे, असा संदेश यावेळी उपस्थित मान्यवरांनी दिला.




# माणसे दाखवण्यापेक्षा माणसांची एकी दाखवा...

आजकाल मित्र, नातेवाईक, सखे भाऊ, सावत्र भाऊ, चुलत भाऊ आणि चुलते किंवा कुळातील वा वंशातील रक्ताचे नाते असलेले इतर सदस्य यांच्यात हल्ली एकीचे व समतेचे वातावरण न दिसता, यांच्यात संघर्षमय व संशयी वातावरण पाहायला मिळत आहे. आजकाल प्रत्येक जण म्हणतोय की, माझं खानदान खूप मोठं आहे. माझ्या घरात खूप माणसे आहेत. माझ्या एवढे मित्र कोणालाच नाहीत. माझा खूप दांडगा मित्रपरिवार आहे, तुम्ही चटणीला देखील पुरायचे नाहीत. असे प्रत्येक जण म्हणताना दिसतो. मोठ्या अभिमानाने व दिमाखाने सांगतो की, माझ्या घरात खूप एकी आहे. माझ्या मागे १०० युवकांचा संघ आहे. म्हणून माझ्या वाटेला कोणी लागताना दिसत नाही. यदाकदाचीत तशी परिस्थिती जर कोणावर ओढवली आणि त्याने आपल्या मित्राला जर फोन केला, की, भावा मी संकटात आहे, मला मारण्यासाठी मुलांचा टोळका जमा झाला आहे. तू पण आपले मित्र घेऊन ये ना.. असे जर एखाद्याने विचारले तर तो मित्र खरंच त्या मित्राच्या संकटात किंवा भांडण तंट्यात सहभागी होईल, असे मला तर काही वाटत नाही. कारण आजकाल असं झालंय की, एकाच घरात राहणाऱ्या रक्ताच्या नात्यासोबत किंवा जवळच्या भावकी सोबत लहानसहान कारणावरून भांडण तंटे करायचे, एकमेकांना घाण घाण शिव्या घालायच्या, एकमेकांच्या लग्नकार्यात किंवा इतर कार्यक्रमात सहभागी व्हायचे नाही, घरातल्या गोष्टी बाहेर काढायच्या, घरातील व्यक्तींच्या विरोधात बोलून त्याची प्रतिमा मलीन करायची आणि दुसरीकडेच म्हणायचे की आमच्या घरात खूप एकी आहे. आम्ही भांडण तंटे जरी करत असलो तरी टाइमिंगला सर्वजण एक होतो. मान्य आहे की तुम्ही फक्त भांडण तंट्यात एकी दाखवता परंतु जेव्हा आपला माणूस संकटात अडकलेला असतो, त्याला मदतीची नितांत गरज असते, आर्थिक संकटाचा सामना करता करता त्याच्या नाकी नऊ येते, तरीसुद्धा आपल्याला भाऊ दिसत नाही, बहिण दिसत नाह, मित्र दिसत नाही ना गावातील जवळचा किंवा शेजारी दिसत नाही. आपल्याला फक्त भांडणातच एकी दाखवायची नसते. इतर कार्यक्रमात, लग्नकार्यात किंवा छोटेखानी कार्यक्रमात आणि संकटात व दुःखद काळात सहभाग नोंदवून एकी दाखवावी लागते. पण मित्रांनो तुम्ही खरंच विचार करा की, तुम्ही म्हणता आमच्या घरात खूप एकी आहे, आम्ही टायमिंगला एक होतो परंतु जेव्हा खरंच प्रत्यक्षात तुमच्यावर तशी वेळ येते तेव्हा मात्र तुमचे भाऊ, मित्र किंवा इतर सहकारी तुमची ढाल बनून तुमच्या मदतीला धावून येतात का? दुःखात तुम्हाला मायेचा आधार देतात का? सुखात मात्र धावून येतील आणि तुमच्या घराला व घरातील माणसांना नावे ठेवून मात्र जातील. आजकाल कोणीही उठत आहे, आणि भाई, दादा, गुंड व मवाली बनायचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी मित्र गोळा करत आहे, मित्रांना रोज दारू मटन खाऊ घालत आहे, त्यांच्यासोबत दिवसभर फिरत आहे. ते मित्र सुद्धा खाण्यापुरतेच आपल्याजवळ राहतात. आपला स्वार्थ साधतात आणि जेव्हा आपल्यावर संकट येते, आपल्यावर दुःखाचा डोंगर कोसळतो तेव्हा मात्र ते आपली ढाल बनून यायला तयार होत नाहीत, मग असले स्वार्थी व कपटी मित्र काय कामाचे? फेसबुकला पाच हजार मित्र आणि याला विचारणा गल्लीतील काळ कुत्र अशी अवस्था आजकाल मित्रांची झाली आहे...रक्ताच्या नातेवाईकांची झाली आहे...त्यासाठी मित्रांनो १०० कुत्रे सोबत घेऊन फिरण्यापेक्षा शंभराला भारी पडणारा एकच मित्र सोबत घेऊन फिरा आणि ऐनवेळी जीवा महाले सारखा ढाल बनून तुमच्या संकटात कामी येईल. घरात एकी नसल्यावर खूप समस्यांना सामोरे जावे लागते. ज्या घरात एकी नसते, त्या घरात सतत भांडण तंटे, त्यांना समाजातील व गावातील लोक अपमानास्पद बोलतात, त्यांना नावे ठेवतात, त्यांच्या आया बहिणीकडे वासनांध नजरेने बघता, त्यांना कोणीही येऊन मारून जाते कारण त्यांच्यात एकी नसते म्हणून त्यांना या गोष्टीला सामोरे जावे लागते. म्हणून मित्रांनो एकी खूप महत्त्वाची आहे. तुम्ही आजही निरीक्षण करून बघा ज्या घरात एकी नाही त्या घराची अवस्था काय आहे? त्या घराची किंमत सामाजिक दृष्ट्या कशी आहे? त्या घराला समाज बेकीमुळे तुच्छ नजरेने बघतो. आणि आपण इकडे सांगत फिरतोय की, आमच्या घरात खूप एकी आहे... ऐनवेळी आम्ही एक होतच असतो.. नाही मित्रांनो हे पहिला काळ नाही, आता काळ बदलला, लोकांच्या मानसिक कक्षा बदलल्या, माणूस स्वार्थी, लबाड, ढोंगी, धूर्त व कपटी स्वभावाचा बनला. त्याला आपल्यात आपलेच देखवत नाही. गावातील चार शहाण्या लोकांमध्ये सख्खा भाऊ सख्ख्या भावाच्या विरोधात बोलतो... घरातील चुगल्या बाहेर काढतो म्हणजे दुसऱ्यांसोबत भांडणे लावून द्यायला घरातील सदस्यच कारणीभूत आहे. तेच लोकांना आमच्यात एकी नाही असे दाखवून देतात. कारण ते तसे बोलतातच. मग काय? लोकांना पण एवढाच फायदा मिळतो. ते या गोष्टीचा गैरफायदा घेतात आणि त्यांच्यासोबत गैरवर्तन करतात यातूनच वाद विवाद वाढतात. मग कोर्ट कचेरी, पोलीस स्टेशन, एस.पी. ऑफीस या ठिकाणी वाऱ्या कराव्या लागतात. नुसती पोकळी एकी काही कामाची नाही..

रक्ताची एकी ही निबार व अतूट असली पाहिजे. रक्ताची नाळ कधीच तुटता कामा नये...एकदा तुटलेली नाळ परत जुटत नाही. तुटली तरीही पहिल्यासारखी त्याच्यात माया व प्रेम नसते. ज्या घरांमध्ये माणसांची एकी असते, खरोखरच तुम्ही सुद्धा पहा त्या घराला किती किंमत असते? त्या घराकडे बघायला लोक घाबरतात. घरापुढून जायचे म्हटले तर खाली मान घालून जावे लागते. निवडणुकीच्या काळात घराचा फायदा घेण्यासाठी बरेच लोक चतुर कावळ्यासारखे टपून बसलेले असतात. कारण ज्या घरात एकी असते, त्या घरातील माणसे कधीच तुटत नसतात आणि एका माणसाच्या शब्दा पलीकडे जात नसतात. एकीच्या बळावर हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांनी एकीच्या बळावर मुंबईवर राज्य केले. हिटलर याने सैन्याच्या बळावर म्हणजेच एकीच्या बळावर जगावर राज्य करून दाखवले. तसेच महान चक्रवर्ती सम्राट अशोक यांनी सुद्धा जगावर राज्य केले, ते केवळ एकीच्या बळावर... म्हणून जाता जाता मला एवढेच सांगायचे आहे की, युवकांनो, माझ्या भावांनो ज्या घरातील स्त्रिया व माणसे चारित्र्यवान, निष्कपट, निस्वार्थी व अविश्वासू आणि संशयी वृत्तीचे असतात त्याच घरात वाद विवाद व कलह होतातच. त्या घरातील माणसे बिघडतात...त्यांच्याकडे बघण्याचा सामाजिक दृष्टिकोन बदलतो...तुम्ही नुसती पोकळ एकी दाखवण्यापेक्षा प्रबळ एकीने राहा...एकमेकांच्या लग्न कार्यात धावून जा, एकमेकांना मदत करा..एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी व्हा. घरातील गोष्टी व घरातील कमीपणा बाहेर काढू नका..तो मनातल्या मनातच राहू द्या मग बघूया बर कोण तुमच्या नादाला लागतो आणि कोण तुमच्या वाटेला जातो? त्यासाठी फक्त गरज आहे ती फक्त माणसे दाखवण्यापेक्षा माणसांची एकी दाखवण्याची...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे,**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## तणावमुक्त जीवन या विषयावर ब्रह्माकुमारीतर्फे सोमवारी व्याख्यान

**जालना । प्रतिनिधी -** ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय केंद्र जालनाच्यावतीने रोग व तणावमुक्त जीवन या विषयावर सोमवार दि. ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता जुना जालना विभागातील टाऊन हॉल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृहात राजयोगी बी. के. नारायणभाई (इंदौर) यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.



बी. के. नारायणभाई यांनी आजवर देशभरात हजारो लोकांना राजयोगाच्या माध्यमातून मानसिक शांती, सकारात्मक विचार आणि रोगमुक्त जीवनाचा संदेश दिला आहे. या प्रवचनात ते मनातील नकारात्मकता, भविष्याची चिंता, कर्मयोगातून निर्माण होणारे शारीरिक व मानसिक आजार जसे डायबेटीज, ब्लडप्रेशर, डिप्रेशन, हृदयरोग, मायग्रेन, अस्थमा इत्यादीवर मात करण्याचे मार्ग सांगणार आहेत. राजयोग ध्यान व सकारात्मक चिंतनाद्वारे निरोगी आणि तणावमुक्त जीवन कसे शक्य आहे, याबाबत ते मार्गदर्शन करतील. प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य असून, नागरिकांनी या उपयुक्त व प्रेरणादायी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्यावतीने केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी शितल दीदी यांनी केले आहे.

## 'माती म्हणे आभाळाला' चे होणार प्रकाशन कोजागिरी निमित्त कविसंमेलनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** येथील कवी, गझलकार गणेश खरात यांच्या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा आणि कोजागिरी पौर्णिमेनिमित्त सोमवार, ६ ऑक्टोबर रोजी कवि संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील भाग्यनगर येथे सायंकाळी हा कार्यक्रम होणार आहे.

प्रा.राजेंद्र भोसले मित्र मंडळ व मुद्रा साहित्य सेवा संस्थेच्या वतीने हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कवी, गझलकार गणेश खरात यांच्या 'माती म्हणे आभाळाला' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयोजित कविसंमेलनात करण्यात येणार आहे. सुप्रसिद्ध चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्या हस्ते या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुहास सदाव्रते राहणार आहेत. यावेळी ज्येष्ठ समीक्षक डॉ.रावसाहेब ढवळे,
राम गायकवाड, रमेश देहेडकर, मुद्रा संस्थेचे सुधाकर वाहुळे यांची उपस्थिती राहणार आहे. स्वागताध्यक्ष संत साहित्याचे अभ्यासक प्रा. राजेंद्र भोसले हे राहणार आहे. यानंतर निमंत्रित कवींचे कविसंमेलन होणार आहे. सूत्रसंचालन प्रा. पंढरीनाथ सारके व सुहास पोतदार हे करतील. मुद्रा साहित्य सेवा संस्थेचे अध्यक्ष कैलास भाले व
नीलकंठ कुलकर्णी यांनी हा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

## पान १ वरुन

### जालना जिल्हा ...

सरसकट मदत जाहीर होईल अशी शक्यता आहे.

दरम्यान, जिल्हा प्रशासनाने भविष्यात अशा चुका पुन्हा घडू नयेत म्हणून तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर सुधारणा करणे आवश्यक आहे. पंचनाम्यांच्या अहवाल व्यवस्थापनासाठी ऑनलाइन सिस्टीम, डेडलाईन मॉनिटरिंग आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणारे नियम काटेकोरपणे लागू करणे हाच एकमेव उपाय आहे. जालना जिल्ह्याला अतिवृष्टीच्या यादीतून वगळले जाणे ही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी घटना आहे. शेतकरी आधीच नैसर्गिक आपत्तीमुळे त्रस्त आहेत, त्यात प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे मदत मिळण्यात उशीर होणे ही अक्षम्य चूक आहे. शासनाने तातडीने कारवाई करून दिलासा दिला असला तरी या घटनेतून स्पष्ट धडा घेऊन आपत्ती व्यवस्थापनातील जबाबदाऱ्या अधिक कडकपणे पार पाडण्याची वेळ आली आहे.

### नदी पात्रात ...

खोलीकरण, रुंदीकरण व स्वच्छता मोहिमेवर लाखो रुपये खर्च होत आहेत. परंतु पालिकेचे कर्मचारीच नदीला कचराकुंडी बनवत असल्याने नागरिकांचा विश्वास डळमळीत झाला आहे. जर प्रशासनच अशा बेजबाबदार वर्तनास जबाबदार असेल, तर सामान्य नागरिकांना स्वच्छतेसाठी प्रवृत्त करण्याचा अधिकार त्यांना उरत नाही, असे स्थानिक रहिवाशांचे मत आहे.

साद बिन मुबारक यांनी प्रशासनाला इशारा देत म्हटले आहे की, नदी ही जालना शहराची जीवनरेखा आहे. स्वच्छतेच्या नावाखाली जर प्रदूषण केले जाणार असेल, तर हा नागरिकांच्या आरोग्याशी व पर्यावरणाशी खेळ आहे. या प्रकाराला कायमस्वरूपी आळा बसला पाहिजे. त्यांनी ठोस मागणी केली की, दोषींवर केवळ निलंबन न करता कायदेशीर कारवाई व्हावी. भविष्यात अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी कचराव्यवस्थापनाची स्वतंत्र निगराणी समिती गठीत करावी. नदीपात्रात कचरा टाकल्यास गुन्हेगारी कारवाईची तरतूद असावी. या घटनेतून स्पष्ट होते की, स्वच्छता मोहिमेची अंमलबजावणी कागदावरच मर्यादित असून प्रत्यक्षात गंभीर त्रुटी आहेत. ठेकेदार व कर्मचारी यांच्या निष्काळजीपणावर महापालिकेचे पुरेसे नियंत्रण नाही. पर्यावरण रक्षणाच्या घोषणांवर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.

नदीपात्रात कचरा टाकण्याचा प्रकार हा केवळ प्रशासनातील हलगर्जीपणा नाही, तर पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्यावर थेट आघात आहे. आयुक्तांनी दोषींवर कारवाईची घोषणा केली असली तरी या घटनेने पालिकेच्या विश्वासार्हतेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. आता नागरिकांच्या अपेक्षा केवळ घोषणांवर नाहीत, तर प्रत्यक्ष व ठोस कृतीवर केंद्रीत झाल्या आहेत.

### आदित्य विक्रम ..

होते. त्यात प्रामुख्याने पद्मभूषण बन्सीलाल जी राठी (अखिल भारतवर्षीय माहेश्वरी महासभा) आणि केंद्राचे अध्यक्ष नवलकिशोर राठी यांची उपस्थिती लक्षणीय होती.

पद्मभूषण राजश्री बिर्ला यांनी लक्ष्मीनारायण मानधना यांचा सत्कार केला, तेव्हा उपस्थित सर्व उपस्थितांनी टाळ्या वाजवून त्यांचे अभिनंदन केले. हा पुरस्कार सोहळा व्यापार आणि उद्योग क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याला प्रोत्साहन देणारा ठरला.

श्री आदित्य विक्रम बिर्ला मेमोरियल व्यापार उन्नयन केंद्राचा उद्देश व्यापार, उद्योग आणि सामाजिक कार्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करणे हा आहे. हा वार्षिक सोहळा उद्योजकतेला आणि सामाजिक बांधिलकीला प्रेरणा देणारा असतो. या केंद्राचे कार्य बिर्ला कुटुंबाच्या सामाजिक आणि आर्थिक योगदानाच्या वारशाचे प्रतीक आहे.

हा सन्मान सोहळा व्यापार क्षेत्रातील कार्यासाठी एक प्रेरणास्रोत ठरणारा आहे, यात शंका नाही.

### संत निरंकारी ...

व समाजातील लोक एकत्र येऊन प्रेम, एकता आणि बंधुभावाचे अनुपम उदाहरण प्रत्यक्ष साकार करतात. हे आयोजन मानवतेच्या खर्या स्वरूपाला प्रकाशित करते. मानवतेच्या निःस्वार्थ सेवेच्या मार्गावर अग्रेसर संत निरंकारी मिशन, सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली निरंतर समाजकल्याणाचे कार्य समर्पण भावनेने करत आहे. मिशनद्वारे केली जाणारी ही सेवा संपूर्ण विश्व एक कुटुंब या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्याचा सशक्त व यशस्वी प्रयास आहे. मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनद्वारे वेळोवेळी अनेक सामाजिक उपक्रम तसेच शिबिरे आयोजित केली जातात. ज्यात पर्यावरण संरक्षण, आरोग्य सेवा, रक्तदान, स्वच्छता अभियान तसेच आपत्ती निवारण अशा क्षेत्रांत संपूर्ण भारतभर मिशन निरंतर कार्य करत आहे जे उल्लेखनीय व अनुकरणीय आहे. जम्मू-कश्मीरमध्ये आलेल्या नैसर्गिक आपत्तीत जसे की पूर, ढगफुटी आणि ऑपरेशन सिंदूरच्या काळात मिशनने अत्यंत संवेदनशीलता व तत्परतेने मदतकार्य केले. प्रभावित कुटुंबांपर्यंत अन्नधान्य, औषधे व आवश्यक मदत पोहोचवून मिशनने पुन्हा एकदा सिद्ध केले, की ते मानव सेवेच्या प्रत्येक कार्यासाठी सदैव तत्पर व सक्रिय आहेत. या सेवांची भरपूर प्रशंसा वेळोवेळी समाजातील विविध घटकांसह शासनानेही केली.याच क्रमात, शेर-ए-कश्मीर आंतरराष्ट्रीय संमेलन केंद्र, श्रीनगर येथे आयोजित भव्य समारंभात जम्मू व कश्मीरचे माननीय उपराज्यपाल श्री. मनोज सिन्हाजी यांनी संत निरंकारी मंडळाचे सचिव श्री. जोगिंदर सुखीजाजी यांना मिशनच्या या निःस्वार्थ सेवेबद्दल विशेष सन्मान प्रदान केला. सन्मान स्वीकारताना श्री. जोगिंदर सुखीजाजी म्हणाले, की संत निरंकारी मिशन सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या प्रेरणेने सदैव समाजकल्याण आणि मानव सेवेप्रति कटिबद्ध आहे. आमचे प्रत्येक कार्य सेवा, समर्पण आणि एकत्व या सिद्धांतांवर आधारित आहे. नैसर्गिक आपत्तीमधील मदतकार्य असो वा रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमांतील सहभाग असो, या सगळ्यात मिशन नेहमीच अग्रेसर राहिले आहे. आमचा उद्देश प्रत्येक मानवापर्यंत प्रेम, शांती आणि ऐकतेचा संदेश पोहोचवणे हा आहे. निःसंशयपणे, गांधी जयंतीच्या या स्मरणीय प्रसंगी संत निरंकारी मिशनचा सहभाग व मिशनला मिळालेला सन्मान हे दोन्हीसुद्धा समाजाप्रतीच्या मिशनच्या समर्पण, निःस्वार्थ सेवा आणि विश्वबंधुत्वाच्या भावनेचे उज्ज्वल प्रतीक आहे. हे मिशन आजही त्याच आदर्श मार्गावर वाटचाल करत आहे, जिथे मानवता सर्वोतोपरी आहे. व समाजातील लोक एकत्र येऊन प्रेम, एकता आणि बंधुभावाचे अनुपम उदाहरण प्रत्यक्ष साकार करतात. हे आयोजन मानवतेच्या खर्या स्वरूपाला प्रकाशित करते. मानवतेच्या निःस्वार्थ सेवेच्या मार्गावर अग्रेसर संत निरंकारी मिशन, सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली निरंतर समाजकल्याणाचे कार्य समर्पण भावनेने करत आहे. मिशनद्वारे केली जाणारी ही सेवा संपूर्ण विश्व एक कुटुंब या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्याचा सशक्त व यशस्वी प्रयास आहे. मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनद्वारे वेळोवेळी अनेक सामाजिक उपक्रम तसेच शिबिरे आयोजित केली जातात. ज्यात पर्यावरण संरक्षण, आरोग्य सेवा, रक्तदान, स्वच्छता अभियान तसेच आपत्ती निवारण अशा क्षेत्रांत संपूर्ण भारतभर मिशन निरंतर कार्य करत आहे जे उल्लेखनीय व अनुकरणीय आहे. जम्मू-कश्मीरमध्ये आलेल्या नैसर्गिक आपत्तीत जसे की पूर, ढगफुटी आणि ऑपरेशन सिंदूरच्या काळात मिशनने अत्यंत संवेदनशीलता व तत्परतेने मदतकार्य केले. प्रभावित कुटुंबांपर्यंत अन्नधान्य, औषधे व आवश्यक मदत पोहोचवून मिशनने पुन्हा एकदा सिद्ध केले, की ते मानव सेवेच्या प्रत्येक कार्यासाठी सदैव तत्पर व सक्रिय आहेत. या सेवांची भरपूर प्रशंसा वेळोवेळी समाजातील विविध घटकांसह शासनानेही केली.याच क्रमात, शेर-ए-कश्मीर आंतरराष्ट्रीय संमेलन केंद्र, श्रीनगर येथे आयोजित भव्य समारंभात जम्मू व कश्मीरचे माननीय उपराज्यपाल श्री. मनोज सिन्हाजी यांनी संत निरंकारी मंडळाचे सचिव श्री. जोगिंदर सुखीजाजी यांना मिशनच्या या निःस्वार्थ सेवेबद्दल विशेष सन्मान प्रदान केला. सन्मान स्वीकारताना श्री. जोगिंदर सुखीजाजी म्हणाले, की संत निरंकारी मिशन सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या प्रेरणेने सदैव समाजकल्याण आणि मानव सेवेप्रति कटिबद्ध आहे. आमचे प्रत्येक कार्य सेवा, समर्पण आणि एकत्व या सिद्धांतांवर आधारित आहे. नैसर्गिक आपत्तीमधील मदतकार्य असो वा रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमांतील सहभाग असो, या सगळ्यात मिशन नेहमीच अग्रेसर राहिले आहे. आमचा उद्देश प्रत्येक मानवापर्यंत प्रेम, शांती आणि ऐकतेचा संदेश पोहोचवणे हा आहे. निःसंशयपणे, गांधी जयंतीच्या या स्मरणीय प्रसंगी संत निरंकारी मिशनचा सहभाग व मिशनला मिळालेला सन्मान हे दोन्हीसुद्धा समाजाप्रतीच्या मिशनच्या समर्पण, निःस्वार्थ सेवा आणि विश्वबंधुत्वाच्या भावनेचे उज्ज्वल प्रतीक आहे. हे मिशन आजही त्याच आदर्श मार्गावर वाटचाल करत आहे, जिथे मानवता सर्वोतोपरी आहे.

## सोनल नगर भागातील गंभीर नागरी समस्या तात्काळ सोडवा

### युवासेनेचे शुभम टेकाळे यांची लेखी निवेदनाव्दारे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील सोनल नगर, नीलम नगर व नरीमन नगर भागातील नागरी समस्या अंत्यत गंभीर झाल्या असून तातडीनं सोडवाव्यात यासाठी जालना शहर महानगपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना लेखी निवेदन दिले.

निवेदनामध्ये सोनल नगर , नीलम नगर भागामध्ये मुख्य नालीचा महत्वाचा प्रश्न आहे. लगतच्या काळात झालेल्या अतिवृष्टी मुळे मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते.बऱ्याच घरात पाणी गेले.प्रामुख्यानं मुख्य नाली करण्याची अत्यंत गरज आहे.पाण्यामूळे मोकळ्या जागेत गवत मोठ्या प्रमाणात उगले असून यामध्ये विषारी साप हे घरात येत असल्याने नागरिकांमध्ये भितिचे वातावरण आहे.

यातच या भागातील पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी अंधारामुळे चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून. तातडीनं हि सर्व पथदिवे चालू करावीत. घाण पाणी साचल्याने मच्छर मोठ्या प्रमाणात झाले असून यामुळं लहान मुले व वृद्धांना डेंग्यूची लागण होत आहे.तातडीनं महानगरपालिका प्रशासनाने मच्छर रोज फवारणी करावी. तसेच कचऱ्याची घंटा गाडी हि नियमित चालू करावी.खुल्या जागेतील वाढलेले गवत याची महानगरपालिकेच्या वतीने तात्काळ साफसफाई करावी. असे लेखी निवेदनात नमूद केले आहे. तसेच सोनल नगर , नीलम नगर नरिमन नगर भागातील समस्या ह्या अंत्यत गरजेच्या असून.या भागातील नागरिकांना प्रचंड त्रास असल्याने या भागातील नागरिकांसह महिला भगिनींच्या भावना अंत्यत तीव्र आहेत.

तातडीनं वरील सर्व समस्या सोडवाव्यात अन्यथा सोनल नगर , नीलम नगर नरिमन नगर भागातील नागरिकांच्या वतीने महानगरपालिकेच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा लेखी निवेदनात दिला.यावेळी अविनाश गरड उपस्थित होते

# पालकमंत्र्यांची जिल्ह्यात अनुपस्थिती; नाराजीचा सूर तीव्र; लोणीकरांना पालकत्वाची जबाबदारी द्या; जालना जिल्ह्यातील जनतेची मागणी



**जालना | प्रतिनिधी -** जिल्हा प्रशासनाच्या आज झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या १५० दिवस कृती कार्यक्रमातून पुन्हा एकदा जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या अनुपस्थितीचा मुद्दा ठळकपणे समोर आला आहे. पंकजा मुंडे या जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री असल्या, तरी आजच्या महत्त्वाच्या नियुक्ती वितरण कार्यक्रमालाही त्यांनी गैरहजेरी लावली. त्या मुंबईत ओबीसी समाजाच्या बैठकीसाठी गेल्या असल्याची माहिती आहे. मात्र, जिल्ह्यातील जनतेच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे - प्रत्येक वेळी जालना जिल्ह्याचे प्राधान्य का दुय्यम ठरते?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ऑनलाईन माध्यमातून राज्यभर अनुकंपा नियुक्ती व एमपीएससीमार्फत निवड झालेल्या लिपिक-टंकलेखन संवर्गातील उमेदवारांना नियुक्तीपत्र वाटप कार्यक्रम घेण्यात आला. जालन्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात यासाठी स्वतंत्र कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या ठिकाणी प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री पंकजा मुंडे उपस्थित राहणार होत्या. मात्र, त्यांच्या अनुपस्थितीने प्रशासन आणि कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त झाली.

**फक्त झेंडावंदनापुरत्या येतात - स्थानिकांचा सूर**

जालना जिल्ह्यातील नागरिक, सामाजिक संघटना आणि काही राजकीय कार्यकर्त्यांचा एकमुखी सूर असा आहे की, पालकमंत्री फक्त स्वातंत्र्यदिवस आणि प्रजासत्ताकदिनी झेंडावंदनासाठीच दिसतात. जिल्ह्याच्या विकासाबाबत, पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत, शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत त्यांचा ठोस हस्तक्षेप दिसून येत नाही.

अवकाळी पावसाने जिल्ह्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असताना, पालकमंत्री केवळ प्रतीकात्मक पाहणीपुरत्या आल्या आणि तत्पश्चात त्या पुन्हा अनुपस्थित राहिल्या, अशी नाराजी व्यक्त होत आहे.

**लोणीकरांच्या बाजूने वाढतं समर्थन**

याउलट, माजी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या कार्यकाळात जिल्ह्यातील अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांना गती मिळाली होती. पाणलोट क्षेत्र विकास, पिण्याच्या पाण्याच्या योजना, सिंचन प्रकल्प, आणि ग्रामीण रस्ते या क्षेत्रांतील त्यांच्या पुढाकाराची आजही चर्चा आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःही अनेकदा त्यांच्या कामगिरीची दखल घेतली होती. त्यामुळे जनतेतून आता लोणीकरांना पुन्हा मंत्रिपद द्या आणि जालना जिल्ह्याचे पालकत्व त्यांच्याकडे द्या अशी मागणी जोर धरू लागली आहे.

जालन्यातील राजकीय समीकरण पाहता ही मागणी केवळ भावनिक नाही, तर रणनीतीदृष्ट्याही महत्त्वाची ठरू शकते. पालकमंत्री पंकजा मुंडे या बीड जिल्ह्याच्या आहेत; त्यांचे राजकीय केंद्र तिकडेच आहे. जालना जिल्ह्यात त्यांचा संपर्क आणि वारंवार भेटी तुलनेने कमी आहेत. त्यामुळे स्थानिक स्तरावर निर्णय प्रक्रियेत आणि निधी वाटपात जालना मागे पडत असल्याची भावना वाढत चालली आहे. याउलट लोणीकर हे जिल्ह्याचेच आमदार असून प्रशासनाशी जवळून कार्य करण्याचा त्यांना अनुभव आहे. राजकीय पातळीवर हा मुद्दा स्थानीक विरुद्ध बाहेरचे नेतृत्व या भावनेला खतपाणी घालणारा ठरू शकतो.

**शेतकरी आणि जनतेच्या अपेक्षा**

जिल्ह्यात अलीकडील अतिवृष्टी, पूरस्थिती, आणि शेतकऱ्यांचे नुकसान या पार्श्वभूमीवर लोकांना एक सक्षम, निर्णयक्षम आणि सतत उपस्थित राहणारा पालकमंत्री हवा आहे.


आमदार लोणीकर यांनी अलीकडेच अतिवृष्टीच्या यादीतून जिल्हा वगळल्याबाबत प्रशासनातील त्रुटींवर उघडपणे आवाज उठवला होता. त्यांच्या या भूमिकेने अनेक शेतकऱ्यांचा विश्वास त्यांच्याकडे पुन्हा वाढला आहे.

जालना जिल्ह्याच्या प्रगतीसाठी स्थायी नेतृत्वाची आवश्यकता आहे. जिल्ह्यातील प्रश्न जाणणारा, वारंवार भेटी देणारा आणि प्रत्यक्ष काम करणारा नेता पालकत्वाच्या भूमिकेत हवा, अशी भावना आता सर्वच स्तरांवर बळावत आहे.

म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्ह्याच्या राजकीय आणि प्रशासकीय हिताचा विचार करून जालनेकरांना जालनेकरच पालक हवा या भावनेचा विचार करावा, अशी मागणी विविध राजकीय आणि सामाजिक मंडळींकडून होत आहे.

पंकजा मुंडे या राज्यातील एक मजबूत महिला नेता आहेत, परंतु पालकमंत्रिपद हे केवळ सन्मानाचे नसून जबाबदारीचे पद आहे. जालना जिल्ह्यातील वारंवारची गैरहजेरी, अपूर्ण संवाद आणि जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष हे घटक त्यांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उभे करत आहेत. जर ही नाराजी थांबवायची असेल, तर त्यांना जिल्ह्यात नियमित दौरे, प्रगती आढावा बैठक, आणि संवाद वाढवावा लागेल, अन्यथा पालकत्व ही संकल्पना फक्त कागदावरच राहील.

जालना जिल्ह्याला प्रत्यक्ष उपस्थित राहणारे, कार्यक्षम, आणि स्थानिक समस्यांशी निगडीत पालकमंत्री हवेत. हा जनतेच्या मनातील आवाज स्पष्ट आहे. जालना जिल्ह्याचा पालक आपल्या घरातला असावा! आता हे मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचतं का, आणि त्यातून प्रत्यक्ष बदल घडतो का? हे येणारा काळच ठरवेल.



---

अनुकंपा व लिपिक भरती नियुक्ती आदेश वितरणाचा राज्यस्तरीय कार्यक्रम उत्साहात

## जालना जिल्ह्यात १२८ उमेदवारांना नियुक्ती आदेश वाटप: अनुकंपा व एमपीएससी उमेदवारांना रोजगाराचा दिलासा

### नियुक्ती आदेश म्हणजे उमेदवारांच्या स्वप्नपूर्तीची पहिली पायरी - आमदार बबनराव लोणीकर

**जालना | प्रतिनिधी -** राज्य शासनाच्या १५० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत जालना जिल्ह्यात अनुकंपा व महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश वितरण सोहळा शनिवारी (दि. ४ ऑक्टोबर) जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात भव्यदिव्य वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात एकूण १२८ उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमास माजी मंत्री व आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी अशीमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बनसोडे, जिल्हा पोलीस अधीक्षक बंसल आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

राज्यस्तरीय समारंभ मुंबई येथे पार पडला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नियुक्ती आदेशांचे वितरण झाले. त्याचे थेट प्रक्षेपण जालना येथे दाखविण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री गिरीश महाजन व मंत्री छगन भुजबळ यांनी ऑनलाईन मार्गदर्शन करून तरुणांना शुभेच्छा दिल्या. शासनाने रोजगार निर्मितीसाठी घेतलेल्या प्रयत्नांचा व पारदर्शक प्रक्रियेचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

जालना जिल्ह्यातील उमेदवारांपैकी गट-क (अनुकंपा) ३९, गट-ड (अनुकंपा) ३९ आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग शिफारस प्राप्त ५० अस्या १२८ उमेदवारांचा समावेश आहे. या उमेदवारांना जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस विभाग, कृषी विभाग, पुरवठा कार्यालय, मृदा व जलसंधारण, वैद्यकीय शिक्षण विभाग अशा विविध शासकीय कार्यालयांमध्ये नियुक्ती मिळाली आहे.

या प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जनसेवा हीच ईश्वरसेवा हे तत्त्व मानून कार्य करण्याचे आवाहन उमेदवारांना केले. नियुक्ती मिळालेल्या सर्वांना शुभेच्छा देताना त्यांनी जालना जिल्ह्यात उद्भवलेल्या पूर व अतिवृष्टीच्या परिस्थितीचे उत्कृष्ट व्यवस्थापन केल्याबद्दल जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांच्या कार्याचे गुणगौरव केला. तसेच जिल्ह्यात विविध उपोषण, आंदोलन यशस्वीपणे व शांततेत हाताळल्याबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक बंसल यांच्या कार्यक्षमतेचेही कौतुक केले.

आमदार अर्जुन खोतकर यांनी आपल्या भाषणात तरुणांनी मिळालेल्या संधीचे सोने करून जबाबदारीने काम करावे, असे आवाहन केले. समाजहितासाठी व प्रशासनाच्या माध्यमातून जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करणे ही खरी सेवा असल्याचे त्यांनी नमूद केले. आमदार नारायण कुचे यांनी तरुणांच्या पाठीशी सदैव उभे राहू, असे आश्वासन देत उमेदवारांना शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पारदर्शक व वेगवान कार्यपद्धतीतून नियुक्ती आदेश देण्यात आले असल्याचे सांगितले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बनसोडे यांनी उमेदवारांना प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ राहण्याचे आवाहन केले. जिल्हा पोलीस अधीक्षक बंसल यांनी नियुक्त उमेदवारांनी प्रशासनाच्या माध्यमातून लोककल्याणासाठी आपली जबाबदारी पार पाडावी, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमात नियुक्ती आदेश मिळालेल्या उमेदवारांचा उत्साह ओसंडून वाहत होता. अनेक उमेदवारांनी आपल्या पालकांसह हा क्षण साजरा केला. अनुकंपा नियुक्तीमुळे दीर्घकाळ प्रतीक्षेत असलेल्या कुटुंबांना दिलासा मिळाला असून, एमपीएससीत यशस्वी झालेल्या तरुणांच्या परिश्रमांना योग्य न्याय मिळाला आहे.

जालना जिल्ह्यात पार पडलेला हा सोहळा केवळ औपचारिक कार्यक्रम न ठरता शासनाच्या रोजगार निर्मितीविषयीच्या बांधिलकीचे प्रतीक ठरला. उमेदवार व कुटुंबीयांच्या डोळ्यांतील आनंदाचे अश्रू हा कार्यक्रम संस्मरणीय करून गेले. या निमित्ताने जिल्हा प्रशासनाच्या कार्यक्षमतेला व जनतेशी जोडलेल्या आपुलकीला सर्व मान्यवरांनी दाद दिली.




---

## अन्यथा आगामी निवडणुकीत भाजपा विरोधात मतदान करा - दीपक बोऱ्हाडे

### राज्यभर दौरा करून संवाद साधणार



**जालना | प्रतिनिधी -** आतापर्यंत आम्ही सत्ताधाऱ्यांच्या चक्रव्हुवात फसत गेलो, धनगर समाजाला एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी यासाठी आपण केलेल्या सोळा दिवसांच्या आमरण उपोषणामुळे कश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत क्रांतीची ज्वाला पेटली असून शासनासोबत चर्चा सुरू आहे. आगामी निवडणुकांपूर्वी धनगर समाजबांधवांना एसटी चे प्रमाणपत्र न मिळाल्यास येणाऱ्या निवडणुकांमध्ये सत्ताधाऱ्यांच्या विरोधात मतदान करा असे आवाहन दीपक बोऱ्हाडे यांनी पत्रकार परिषदेत केले.

सोळा दिवसांच्या आमरण उपोषणानंतर एका इस्पितळात उपचार घेत असलेले दीपक बोऱ्हाडे यांनी दोन दिवसांपूर्वी उपोषण स्थगित केले होते. शनिवारी ( ता.०४) पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी शिवप्रकाश चितळकर, प्रल्हाद नेमाणे, संतोष काळे, संतोष लव्हटे, शाम बोऱ्हाडे, निखिल वीर, गोविंद जाधव आदींची उपस्थिती होती.

दीपक बोऱ्हाडे यावेळी बोलतांना म्हणाले, आपल्या आंदोलनामुळे सरकारवर दबाव निर्माण करण्यात यशस्वी झालो असून समाज आता संघर्षाच्या पावित्र्यात आहे. समाज बांधवांकडून मुंबई आंदोलनाविषयी विचारणा होत असून सध्याच मुंबईला न जाता राज्यभर आभार दौरा करून वाडी, वस्ती, तांड्यावर समाज बांधवांची चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले सरकार आता आपल्याला उपोषण करून देणार नाही असा विश्वास व्यक्त करत आपण आशावादी असल्याची पुष्टी जोडली. मुंबईला एक दिवस जाऊन राज्य शासनाला चेतावणी दिली जाईल. प्रश्न न सुटल्यास दिल्ली कुच करण्यासाठी सुद्धा महाराष्ट्र सोबतच राजस्थान, उत्तराखंड येथील समाजबांधव सज्ज असल्याचे दीपक बोऱ्हाडे यांनी सांगितले. सर्टिफिकेट नाही तर मतदान नाही असा नारा आपल्या उपोषण आंदोलनात दिला असून निवडणुकांपूर्वी प्रमाणपत्र न दिल्यास आगामी निवडणुकीत अणुबॉम्ब पेक्षाही मोठे शस्त्र असलेल्या मतांचा अधिकार वापरून समाज बांधवांनी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात नोटा किंवा अन्य कोणालाही मतदान करावे असे आवाहन दीपक बोऱ्हाडे यांनी केले.

**आत्महत्या करू नका. ..!**

आपले युद्ध मोठे असून अनेक छूपे शत्रू आहेत. आत्महत्या करून जिंकता येत नाही. संयम, धैर्य व ताकतीने लढायचं, जीवन हे अनमोल असून तूमची कुटुंब, समाजाला गरज आहे. आपली शक्ती सरकारला सरळ करण्यासाठी खर्ची घालू असे सांगून तरूण व समाजबांधवांनी आत्महत्या करू नये असे आवाहन दीपक बोऱ्हाडे यांनी केले.

---

## कौशल्याबाई तुकाराम खरात यांचे निधन

**जालना | प्रतिनिधी -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात काम करण्याचा लाभ लाभलेल्या व आयुष्यभर समाजकार्याला वाहून घेतलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या कौशल्याबाई तुकाराम खरात यांचे दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्या आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत समाजातील उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी अथक प्रयत्नशील राहिल्या.



दलित, शोषित व वंचितांच्या प्रश्नांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. स्त्रीशक्तीच्या सबलीकरणासाठीही त्यांचे कार्य मोलाचे मानले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे तत्त्वज्ञान समाजापर्यंत पोहोचविण्यात त्यांनी विशेष योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे समाजात अनेकांना मार्गदर्शन मिळाले.

त्यांच्या पश्चात मुली वंदना राजू खरात, पूजा प्रशांत खरात, प्रीती अमोल खरात आणि नातू विश्वदीप राजू खरात असा परिवार आहे.

---

## फुल-फळ विक्रेते मुस्लिम गुंडाकडून हिंदू व्यापाऱ्याला बेदम मारहाण

**परतूर | प्रतिनिधी -** दसऱ्याच्या गर्दीत दुकानासमोर फुलांचे दुकान लावण्यास मज्जाव केल्याने चिडलेल्या मुस्लिम फुल विक्रेत्यांनी सामान्य लेडीज वेअर चे दुकानदार गोपाळ शर्मा यास दुकानातून बाहेर ओढून अमानुष बेदम मारहाण केली व त्यास जीवे मारण्याचा प्रयत्न केला यात त्याचा उजवा पाय मोडला असून उजव्या हातसंही गंभीर इजा झाली, यावेळी रस्त्यावर असणाऱ्यांनी त्याला वाचवण्या ऐवजी बघ्याची भूमिका घेतली. त्याला गंभीर जखमी झाल्याने जालना येथे हलवले आहे.

या घटनेने शहरात संतप्त वातावरण झाले यात व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सुरेश मंत्री यांच्यासह सर्व व्यापारी भाजपचे शहर संघटक सावता काळे अर्जुन जगताप भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे शहराध्यक्ष प्रवीण सातोणकर यांनी संतप्त भूमिका मांडत दसरा कार्यक्रमावर बहिष्कार घालण्याचा इशारा दिल्यानंतर आमदार बबनराव लोणीकर व युवा नेते राहुल लोणीकर यांनी पोलीस निरीक्षक सुदाम भागवत पोलीस उपाधीक्षक रामेश्वर रिंगे यांना तात्काळ आरोपीविरुद्ध कारवाई करून अटक करण्याचे सूचना केल्या शिवाय शहरांमध्ये धार्मिक तेढ निर्माण व्हावा खोटी अफ़वा कटकरस्थान करणे व शहराचे वातावरण दूषित केल्याप्रकरणी गंभीर गुन्हा दाखल करण्यात यावा अशा सूचना केल्या.

याप्रकरणी पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल करून चार आरोपींना अटक करून फरार आरोपींचा शोध घेत आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.